**मिरा भाईंदर महानगरपालिक**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धी पत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालमत्ता कर आकारणी विक्रमी पातळीवर**
- **कर विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे तसेच जनजागृती उपक्रमाचे केले कौतुक**

**मिरा-भाईंदर, २ एप्रिल २०२५:** मिरा भाईंदर महानगरपालिकेने मालमत्ता कर जमा करण्यात विक्रमी कामगिरी केली असून, ३१ मार्च २०२५ रोजी मध्यरात्रीपर्यंत एकूण ₹ २४१.५९ कोटींची कर आकारणी करण्यात आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा तब्बल ४८ कोटी जास्त कर गोळा करण्यात आला आहे. नागरिकांमध्ये कराचे महत्त्व पटवून देण्याच्या सातत्यपूर्ण जनजागृती मोहिमा आणि मनपा अधिकाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे ही यशस्वी कर वसुली साध्य झाली आहे. या कर गोळा करण्याच्या प्रक्रियेत कर विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मोलाची कामगिरी केली, कष्ट घेतले यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा यांनी सत्कार केला.

मालमत्ता कर वसुली वाढवण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागासोबत नियमित आढावा बैठकांचे आयोजन करण्यात आले. मालमत्ता कर वसुलीचा वेग वाढवण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा झाली. कराचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्यासाठी विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. कर आकारणी ही केवळ आर्थिक जबाबदारी नसून शहराच्या विकासासाठी एक महत्त्वपूर्ण योगदान आहे, अशी जनजागृती करण्यात आली होती.

जनजागृती आणि नियोजन यामुळे विक्रमी कर जमा झाला. कर नीधी महानगपालिकेच्या विकासकामांसाठी, जनकल्याणकारी उपक्रमांसाठी आवश्यक असतो. त्यामुळे मालमत्ता कर जमा करण्यात विशेष योगदान दिलेल्या सहाय्यक आयुक्त चंद्रकांत बोरसे, कर निरीक्षक विनोद सामंत, लिपिक सुभाष पाटील आणि शिपाई दत्ता म्हात्रे यांचा सत्कार मनपा आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी केला. त्यांचे प्रयत्न आणि जनजागृती मोहिमांचे यश यामुळे विक्रमी कर आकारणी झाली.

आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या प्रयत्नांमुळे www.mbmc.gov.in आणि MyMBMC मोबाइल ॲपद्वारे कर भरणा सुलभ करण्यात आला. ऑनलाईन पद्धतीने १.४ लाख नागरिकांनी तर रोख आणि धनादेशाद्वारे १.५९ लाख नागरिकांनी कर भरणा केला. तसेच कर वसुली वाढवण्यासाठी मनपाने प्रलंबित मालमत्तांवर कारवाईसाठी योजना आखली होती. ज्या मालमत्ताधारकांकडे अनेक वर्षांपासून थकबाकी होती, त्यांच्यावर मालमत्ता जप्त करण्याची व लिलावाची कारवाई करण्यात आली. या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि अनेक मालमत्ताधारकांनी कर भरणा सुरू केला.

सत्कार करताना आयुक्तांनी सांगितले की, गोळा झालेला कराचा निधी शहराच्या विकासकामांसाठी, सार्वजनिक कल्याणकारी योजनांसाठी आणि नागरी सुविधांच्या उभारणीसाठी वापरण्यात येणार आहे. यामुळे शहरातील पायाभूत सुविधा आणि नागरी जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल. तसेच, नागरिकांनी नियमितपणे कर भरून जनसेवा करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.